


दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध Email : newsaksharaj2021@gmail.com

उद्याचा रंग आहे, रॉयल ब्लू

वर्ष : ०६ | अंक : ६०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१३ ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## मराठवाडा पदवीधर निवडणुकीत उत्कंठावर्धक घडामोडी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, छ. संभाजीनगर :** मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आता प्रत्यक्ष प्रचाराच्या तोफा धडाडू लागल्या आहेत. या निवडणुकीच्या रिंगणात अधिकृतपणे ४१ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. मात्र, या सर्व घडामोडींमध्ये यंदाची निवडणूक ही केवळ संख्याबळाची नसून, प्रामुख्याने दोन बड्या शिक्षणसम्राटांमधील थेट लढत ठरल्याचे स्पष्ट होत आहे.

सलग चौथ्यांदा निवडणुकीच्या मैदानात उतरलेले उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार सतीश चव्हाण आणि महाविकास आघाडीकडून रिंगणात उतरलेले डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्यातील या समोरासमोरच्या लढतीने राजकीय वातावरणात मोठी रंगत आणली आहे.

**भाजपची बंडखोरी टळली, पण जमिनीवर समन्वय किती प्रभावी?**

या निवडणुकीच्या सुरुवातीला महायुतीमध्ये उमेदवारीवरून मोठी चलबिचल पाहायला मिळाली होती. विशेषतः, भाजपकडून स्थानिक पातळीवर मोठी तयारी सुरू असल्याने आणि मागील राजकीय संघर्षांच्या पार्श्वभूमीवर भाजप कार्यकर्त्यांची नेमकी भूमिका काय असणार, याविषयी राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा रंगली होती. मात्र, ऐनवेळी वरिष्ठ पातळीवरील मध्यस्थीनंतर भाजपच्या नाराज उमेदवाराने माघार घेतल्यामुळे पक्षांतर्गत संभाव्य बंडखोरी टळली. यामुळे सतीश चव्हाण यांना मोठा दिलासा मिळाला असला, तरी वर्षानुवर्षे त्यांच्या विरोधात दंड थोपटणाऱ्या तळागाळातील भाजप कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन महायुतीचा प्रचार किती ताकदीने राबवला जातो, यावरच बऱ्याच गोष्टी अवलंबून असणार आहेत.

**तेल लावलेले पैलवान शरद पवारांची नवी राजकीय व्यूहरचना?**

आत्तापर्यंतच्या निवडणुकांमध्ये विद्यमान आमदार सतीश चव्हाण यांच्याविरोधात तगडा आणि सर्वसमावेशक उमेदवार दिला जात नसल्याची चर्चा नेहमीच होत असे. मात्र, यावेळी राजकीय धुरंधर मानले जाणारे शरद पवार यांनी मोठी रणनीती आखत, शिक्षणसम्राट असलेल्या डॉ.प्रतापसिंह पाटील यांना महाविकास आघाडीकडून मैदानात उतरवले आहे. त्यामुळे सतीश चव्हाण यांच्यासमोर यंदा एका तगड्या आणि संघटित राजकीय आव्हानाचा सामना करण्याचे चित्र निर्माण झाले आहे.



**दोन्ही बाजूंकडे शिक्षणसंस्थांचे जाळे आणि तुल्यबळ ताकद**

या निवडणुकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, रिंगणात प्रमुख भूमिकेत असलेले दोन्ही प्रमुख उमेदवार हे शिक्षणक्षेत्राशी घट्ट जोडलेले 'शिक्षणसम्राट' आहेत. सतीश चव्हाण यांच्याकडे जसा प्रदीर्घ राजकीय अनुभव, सत्तेची पार्श्वभूमी आणि मराठवाड्यात पसरलेले संस्थात्मक जाळे आहे, तसेच मजबूत शैक्षणिक पार्श्वभूमी आणि जनसंपर्क डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या पाठीशीही आहे. त्यामुळे विकासात्मक कामांचे दावे, संस्थात्मक बळ आणि वैयक्तिक संपर्क या आघाड्यांवर ही निवडणूक अत्यंत अटीतटीची होणार यात शंका नाही.

**महाविकास आघाडीतील तिढा आणि तिरंगी लढत**

एकीकडे महायुतीमधील राजकीय जुळवाजुळव यशस्वी ठरत असली, तरी महाविकास आघाडीच्या बाजूने काहीसा तिढा कायम राहिला आहे. मविआकडून ठाकरे गटाकडून दिलीप घुगे यांनी उमेदवारी अर्ज केला, तर दुसरीकडे राष्ट्रवादी (शरद पवार गट) कडून डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी आपली उमेदवारी कायम ठेवल्यामुळे निवडणुकीतील तिरंगी किंवा बहुकोनीय चुरस वाढली आहे. पारंपरिक राजकीय समीकरणांच्या पलीकडे जाऊन मतांचे विभाजन रोखणे आणि पक्षांतर्गत समन्वय राखणे हे सर्वच प्रमुख नेत्यांसमोर मोठे आव्हान असणार आहे.

## मधू कांबीकर यांना मुख्यमंत्र्यांची श्रद्धांजली



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, मुंबई :** महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा जतन करत रुपेरी पटावर अदाकारी आणि चतुरस्त्र अभिनयाने आपली ओळख निर्माण करणारी तारका निमाल्याची शोकभावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पण करताना व्यक्त केली आहे.

'लोककला, रंगभूमी ते चित्रपट सृष्टी असा मधू कांबीकर यांचा कला प्रवास राहिला. लोककलेतील लावणीचा पारंपरिक बाज जपत त्यांनी कथ्थकच्या अभ्यासातून नृत्यांगना म्हणून लौकिक मिळविला. लावणीला आपल्या नृत्य शैलीने आणि नजाकतीने दिमाख मिळवून दिला. रुपेरी पडद्यावरही त्यांनी लावणीचे रूप आणखी खुलवून दाखविले. त्यांनी मराठी चित्रपट सृष्टीत कसदार अभिनयाने अनेक वैविध्यपूर्ण भूमिका समर्थपणे साकार केल्या. कांबीकर यांचा कला प्रवास वैशिष्ट्यपूर्ण आणि या क्षेत्रातील दोन पिढ्यांसाठी मार्गदर्शक, प्रेरणादायी असा राहिला आहे.

ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांचे निधन कला क्षेत्राची मोठी हानी असून, मराठी लोक कलेची पताका रुपेरी पडद्यावर दिमाखाने फडकत ठेवणारी चतुरस्त्र तारका निमाली आहे. आम्ही कांबीकर कुटुंबीय आणि मधूताईंच्या चाहत्यांच्या दुःखात सहभागी असून या सर्वांना हा आघात सहन करण्याची शक्ती ईश्वराने द्यावी अशी प्रार्थना करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## महागाईचा भडका! वाढत्या महागाईमुळे सामान्य नागरिक आर्थिक संकटात



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.१२, चारठाणा (परभणी) :** चारठाणा शहरासह ग्रामीण भागात सध्या महागाईने उच्चांक गाठला असून सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडला आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्याने घरचे बजेट पूर्णपणे कोलमडले आहे.

**साखर, तांदूळ आहार ताटातून गायब !**

डाळी, तांदूळ, साखर आणि खाद्यतेलाच्या किमतीत गेल्या महिनाभरात १० ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या ताटातील सकस आहार हळूहळू गायब होत चालला आहे. अनेक कुटुंबांना आता एक वेळचे जेवण कसे भागवायचे, हा प्रश्न पडला आहे.

**भाजीपाला कडाडला !**

कोरडा दुष्काळ आणि वाढत्या वाहतूक खर्चामुळे बाजारात भाजीपाल्याची आवक घटली आहे. कोथिंबीर, मेथी, पालकसह सर्वच पालेभाज्यांचे भाव दुप्पट झाले आहेत. शंभर रुपयात मिळणारी पिशवी आता तीनशे रुपयांनाही भरत नाही, अशी महिला वर्गाची प्रतिक्रिया आहे.

**इंधन दरवाढीचा फटका :** पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीचा सर्वात मोठा फटका मालवाहतुकीला बसला आहे. वाहतूक महागल्याने प्रत्येक वस्तूची किंमत वाढली असून याचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होत आहे.

**उत्पन्न स्थिर, पण खर्च दुप्पट :** खासगी नोकरी करणाऱ्यांचे पगार गेल्या वर्षभरापासून आहे तिथेच आहेत, मात्र दैनंदिन खर्च दुप्पट झाला आहे. त्यामुळे बचत तर दूरच, मुलांचे शिक्षण, दवाखान्याचा खर्च आणि घरखर्च भागवताना कुटुंब प्रमुखांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

सरकारने महागाई नियंत्रणात आणण्यासाठी ठोस पावले उचलावीत, व शेतकऱ्यांना मिळणारी आर्थिक मदत त्वरित वितरीत करावी अशी मागणी नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

## दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांना २४ तास अखंडित वीजपुरवठा मिळावा : आ.मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती गंभीर बनली असून, पावसातील दीर्घ खंडामुळे शेतीपिकांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना सिंचनावर अवलंबून राहावे लागत असताना, कृषिपंपांसाठी अखंडित वीजपुरवठा मिळणे अत्यंत आवश्यक बनले आहे. अशा परिस्थितीत वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊ नये, शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरू नये आणि विशेषतः धान उत्पादक शेतकऱ्यांना पिकांसाठी आवश्यक पाणी वेळेवर देता यावे, यासाठी कृषिपंपांना २४ तास अखंडित व सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींची गांभीर्याने दखल घेत आ. मुनगंटीवार यांनी यापूर्वीही दोन पत्रांद्वारे शासनाचे लक्ष वेधले असून, दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि त्यांच्या पिकांचे संरक्षण व्हावे, यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

राज्यातील अनेक भागांमध्ये अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने, पावसातील दीर्घ खंडामुळे शेतीसमोर गंभीर आव्हान उभे राहिले आहे. विशेषतः धान उत्पादक भागांत पिकांच्या वाढीसाठी आणि उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी नियमित सिंचन अत्यावश्यक आहे. मात्र, कृषिपंपांचा वीजपुरवठा वारंवार खंडित होणे, कमी दाबाने वीज मिळणे आणि तांत्रिक बिघाड वेळेत दूर न होणे यांमुळे शेतकऱ्यांना पिकांना आवश्यक पाणी देता येत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.शेतकरी आधीच बियाणे, खते, मजुरी आणि वाढत्या उत्पादन खर्चाचा भार सहन करीत आहेत. त्यात पावसाच्या अनिश्चिततेमुळे सिंचनाची गरज वाढली असताना वीजपुरवठाच अनियमित राहिला, तर पिकांचे नुकसान आणि आर्थिक संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. पाणी उपलब्ध असूनही वीज नसल्यामुळे ते पिकांपर्यंत पोहोचवता येत नसेल, तर शेतकऱ्यांच्या कष्टांचे मोल धोक्यात येते. ही परिस्थिती केवळ वीज वितरणातील तांत्रिक समस्या म्हणून न पाहता, शेतकऱ्यांच्या उपजीविकेशी आणि त्यांच्या कुटुंबांच्या भविष्याशी निगडित गंभीर प्रश्न म्हणून हाताळली पाहिजे, अशी भूमिका आ. मुनगंटीवार यांनी निवेदनाद्वारे मांडली आहे.

आ.मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून सादर केलेल्या पत्रांवर संबंधित अतिरिक्त मुख्य सचिव (ऊर्जा) यांना कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिले होते. पण अजून पर्यंत अंमलबजावणी झालेली नाही. शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी लक्षात घेता, या निर्देशांच्या अनुषंगाने कृषिपंपांच्या वीजपुरवठ्याचा प्रश्न प्राधान्याने मार्गी लावणे आवश्यक असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. शासनस्तरावर घेतलेल्या निर्णयांचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आणि त्यांच्या शेतापर्यंत सुरळीत वीजपुरवठा सुनिश्चित होणे महत्त्वाचे असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी कृषिपंपांसाठी नियमित २४ तास वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासोबतच, ज्या गावांमध्ये वारंवार वीजखंडित होत आहे, तेथील विद्युत वाहिन्या आणि अन्य तांत्रिक यंत्रणांची तातडीने तपासणी करण्याची मागणी केली आहे. कमी दाबाच्या वीजपुरवठ्याची समस्या दूर करून कृषिपंप योग्य क्षमतेने चालतील, याची दक्षता घेण्याची गरजही आ.मुनगंटीवार यांनी पत्रात अधोरेखित केली आहे. धान उत्पादक पट्ट्यातील शेतकऱ्यांची सिंचनाची गरज लक्षात घेऊन त्यांना प्राधान्याने अखंडित वीजपुरवठा मिळावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. याशिवाय, वीजपुरवठ्याशी संबंधित तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रभावी संपर्क यंत्रणा कार्यान्वित करावी, आवश्यक तांत्रिक कर्मचारी व दुरुस्ती पथके उपलब्ध करून द्यावीत आणि बिघाड दीर्घकाळ कायम राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सुचविले.

त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून महावितरण आणि संबंधित विभागांना स्पष्ट, कालबद्ध व परिणामकारक कार्यवाहीचे निर्देश द्यावेत. कृषिपंपांसाठी सुरळीत वीजपुरवठा सुनिश्चित करून दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात,अशी ठाम मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे.

## आळंदी हे लाखो वारकऱ्यांचं श्रद्धास्थान ; इंद्रायणीच्या प्रश्न प्रदूषणाचा ऐरणीवर!



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, आळंदी (पुणे) :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पवित्र आळंदी नगरीतून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न पुन्हा गंभीर बनला आहे. एकादशी दिनी आळंदीत दर्शनासाठी आले असता, नदीपात्रात पाय धुण्यासाठी गेलो असता पाण्यातून अत्यंत उग्र दुर्गंधी येत असल्याचे निदर्शनास आले. याच प्रदूषित आणि दुर्गंधीयुक्त पाण्यात अनेक वारकरी व भाविक श्रद्धेने स्नान करत होते, हे अधिक चिंताजनक आहे.

वारकरी माऊलींच्या दर्शनासाठी आळंदीत येतो, आजार घेऊन परत जाण्यासाठी नाही! - महाराष्ट्रभरातून येणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्याचा हा प्रश्न आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

या संदर्भात माहिती सेवा समिती महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष चंद्रकांत वारघडे यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, पुणे जिल्हाधिकारी, पुणे धर्मादाय आयुक्त, आळंदी देवस्थान ट्रस्ट आणि आळंदी नगरपरिषद, आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांना निवेदन देऊन सर्वांचे लक्ष वेधले आहे. वारकऱ्यांची श्रद्धा ही त्यांची कमजोरी नसून महाराष्ट्राची संस्कृती आहे. त्या श्रद्धेचा आदर राखून सुरक्षित सुविधा देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे वारघडे यांनी म्हटले आहे. तातडीने कारवाई न झाल्यास वारकरी बांधव, भाविक आणि नागरिकांना सोबत घेऊन लोकशाही व संवैधानिक मार्गाने जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## ठाणे बेलापूर रोडवर ऐरोली येथे अवैध मद्यसाठा पकडला !

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, मुंबई :** राज्य उत्पादन शुल्कच्या कोकण विभागीय भरारी पथकाने ऐरोली रेल्वेस्थानका समोरील बेलापूर-ठाणे मार्गावर परराज्यातील अवैध मद्याची वाहतूक करणारा बाराचाकी ट्रक पकडला. या कारवाईत एक हजार बॉक्समधील ४८ हजार मद्याच्या बाटल्या आणि ट्रक असा एकूण एक कोटी ३० लाख ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

बेलापूर-ठाणे मार्गावरून अवैध मद्याची वाहतूक होणार असल्याची माहिती विभागीय भरारी पथकाला मिळाली होती. त्यानुसार निरीक्षक दिगंबर शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ऐरोली रेल्वेस्थानकासमोर सापळा रचला. यावेळी चॉकलेटी व पांढऱ्या रंगाचा टाटा कंपनीचा बाराचाकी ट्रक क्रमांक एमएच-१०/ एडब्ल्यू-५२९४ अडविण्यात आला.

वाहनचालकाने ट्रकमध्ये साबणाचे बॉक्स असल्याचे सांगितले. मात्र, पथकाने वाहनाची तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात खाकी रंगाचे बॉक्स आढळले. बॉक्स उघडून पाहिल्यानंतर त्यामध्ये गोवा राज्यात निर्मित, महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेल्या 'रॉयल ब्ल्यू माल्ट व्हिस्की'च्या १८० मिली क्षमतेच्या बाटल्या आढळून आल्या. या बाटल्यांवर बॅच क्रमांक व कमाल किरकोळ किंमत नमूद



नसल्याचेही निदर्शनास आले. एकूण एक हजार बॉक्समधून ४८ हजार बाटल्या जप्त करण्यात आल्या.

या प्रकरणी जावेदखान नवाबखान पिंजारी (वय २४) रा. गधडदेव, पो. बोराडी, ता. शिरपूर, जि. धुळे याला अटक करण्यात आली. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ मधील कलम ६५ (अ), (ई), ८०, ८१, ८३, ९० व १०३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, कोकण विभागाचे विभागीय उपायुक्त प्रदीप पवार आणि ठाणे-१ चे अधीक्षक प्रवीण तांबे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली.

कारवाईत निरीक्षक दिगंबर शेवाळे, दुय्यम निरीक्षक एच.बी. यादव, व्ही.व्ही. सकपाळ तसेच जवान ए.पी. राठोड, हर्षल खरबस, हनुमंत गाढवे आणि अमोल सानप यांनी सहभाग घेतला. प्रकरणाचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक एच.बी. यादव करीत आहेत.




## माणसं जवळची, लांबची आणि माणुसकीची

आपला असा गैरसमज झालेला असतो की सगळी माणसं सारखी असतात आणि चांगली असतात.आपले रक्ताचे नातलग,जीवलग मित्र,जवळचे नातलग, सहकारी आणि दूरचे नातेवाईक सगळे चांगले असतात.सगळेजण माणुसकीला जीवापाड जपतात.दैनंदिन जीवनात कोणत्याही कारणाने आपण अनेक माणसांच्या संपर्कात येतो.कुठे जाताना किंवा कोठून येताना प्रवासाच्या वाटेत आपल्याला अनेक माणसे भेटतात.सण उत्सवात,लग्न समारंभात अनेक व्यक्ती भेटतात.त्यापैकी कोणी ओळखीचे असतात कोणी अनोळखी असतात. अनोळखी माणसांशी संवाद साधताना आपण थोडे कमीच बोलतो.कारण त्यांची आवड निवड आपल्याला माहीत नसते,त्यांचा स्वभावही माहीत नसतो. अनोळखी माणूस नेमका कसा असेल हे ही कळत नाही.जर आपला व त्यांचा संपर्क वाढला तरच त्यांच्या बोलण्यातून त्यांचा खरा चेहरा समोर येतो.याउलट जर प्रवासात एखादा ओळखीचा माणूस भेटला तर मग आपल्या बोलण्याला मर्यादा राहत नाहीत.आपल्या व त्यांच्या मनसोक्त गप्पा रंगतात,एकमेकांना हास्यविनोद ऐकवून मनमुराद हास्याचा आनंद लुटला जातो.परंतु या सगळ्या माणसांमध्ये काही माणसं जवळची म्हणजे नात्यातील असतात.काही माणसं लांबची असतात. त्यातलेच थोडेफार माणुसकी जपणारे असतात आणि आपुलकीचेही असतात.आपण जन्मतानाच अनेक नात्यांचे बंध घेऊन जन्माला येतो.काही नाती रक्ताची असतात काही नाती फक्त नावापुरती व कामापुरती असतात.आणि काही नाती मात्र दूरची असतात. रक्ताची नाती सुखदुःखात साथसोबत देतात,अशा नातेवाईकांसोबत आपण आपले जीवन जगत असतो. दु:खाचे आघात सहन करतो,सुखात आनंदाने नाचतो.जीवनाचे सगळे सोपस्कार पार पाडतो.रक्ताचे नातेवाईक व मित्र परिवार आपण मेल्यानंतर आपला मृतदेह चार चौघांच्या खांद्यावरून स्मशानभूमीत नेऊन यथोचित अंत्यसंस्कार करतात.रक्ताचे नातेवाईक आणि जीवलग मित्रपरिवार अंत्यविधीच्या वेळी आपल्या अगदी जवळ असतात.दूरचे नातेवाईक आणि कामापुरते मित्र आपल्या अंत्यविधीला येतात पण लांबूनच अंत्यविधीचा तमाशा प्रेक्षक होऊन बघतात. आणि जी माणसं आपुलकीची असतात, माणुसकीची असतात ती माणसं कोणत्याही वेळी संकटकाळात सुध्दा आपल्या मदतीला धावून येतात.माणूस म्हणून माणुसकीच्या नात्याने जे जे सहकार्य करता येईल ते सहकार्य करतात.माणसाने माणसांशी माणूस बनून वागणे केव्हाही चांगले असते.पण आजकाल तसे क्वचितच घडते आहे. माणसांनी माणसांसोबत म णसांसारखे वागणे सोडून दिले आहे.

लहानाचे मोठे होताना आणि प्रौढ अवस्थेकडे मार्ग क्रमण करताना आपल्या जाणीवा प्रगल्भ होतात. चांगले काय नि वाईट काय? कळायला लागते. आपण आजवर ज्या ज्या लोकांसोबत जीवनाचा गाडा हाकत होतो त्या सर्व माणसांचा खरा चेहरा,अस्सल स्वभाव आणि व्यवहार कळतात.आपलं कोण, परकं कोण आणि माणुसकीला जपतं कोण?हे चांगले कळायला लागते.जे नातेवाईक श्रीमंत असतात ते आपल्या पंगतीत बसत नाहीत आणि जे नातेवाईक गर्विष्ठ असतात,अहंकारी असतात त्यांच्या पंगतीला आपण जात नाही.व्यसनी नातेवाईकांना निर्व्यसनी नातलग आवडत नाहीत आणि जे नातेवाईक निर्व्यसनी असतात त्यांच्या चांगल्या स्वभावाचा गैरफायदा घेतला जातो.माझे वडील निर्व्यसनी होते आम्ही भावंडं निर्व्यसनी आहोत.व्यसनी नातेवाईक आमच्या घरी येत नाहीत, आले तर मुक्कामाला राहत नाहीत.

आजकाल वडिलोपार्जित संपत्ती व शेतीच्या वाटणी वरून भावाभावांची, बहिण भावांची,बहिणी बहिणींची भांडणे जोरात सुरू आहेत.कोर्टात दावे प्रतिदावे दाखल झाले आहेत.वकिलांना भरमसाठ फी देऊन वडिलोपार्जित शेती व संपत्ती लाटण्यासाठी बहुतांश लोकांची धावपळ सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे.नातेवाईक जपायचे असतात,चार पैशासाठी नातेवाईकांना कोर्टाची पायरी दाखवायची नसते हे नवीन पिढीला समजावून सांगणे काळाची गरज बनली आहे. अवतीभवती खूप माणसं असतात. जवळचे नातेवाईक असतात,मित्र असतात,दूरचे नातेवाईक असतात.या सगळ्यां सोबत माणुसकीने वागणे आपले कर्तव्य असते.आणि जे लोक माणुसकीने व आपुलकीने वागतात त्यांच्या सोबत आपणही तसेच राहिले पाहिजे,माणुसकी धर्म आपणही जपायला हवा.

**– बबन गुळवे**

# दुर्गामाता शक्तिपीठ... करवीर निवासिनी.. कोल्हापूरची श्री. अंबाबाई...!!






## श्री.अंबाबाईच्या नावाने चांगभलं...!!

कोल्हापूरच्या अंबाबाई (महालक्ष्मी) मंदिराचा समावेश शक्तीपिठांमध्ये केला जातो. संपूर्ण भारत तसेच नेपाळ आणि बांग्लादेशचा काही भाग यांमध्ये मिळून एकूण ५१ शक्तीपिठे सांगितली जातात. हे सर्व शक्तीपिठ हे आदि शक्तीच्या विविध रूपांना समर्पित आहेत. शक्तीपिठांच्या निर्मितीबद्दल एक कथा विविध पुराणांमध्ये समाविष्ट आहे. शक्तीने जेव्हा सती रूपाम ध्ये अवतार घेऊन महादेवांसोबत विवाह केला होता, त्यावेळची ही कथा आहे. सतीचे वडील दक्ष यांनी एक यज्ञ आयोजित केलेला होता, जेथे महादेवांना सोडून इतर सर्व जावयांना दक्षाने आमंत्रित केले होते. दक्षाचे सर्व जावई हे विविध देवतागण होते. सतीला वाटले की महादेवांना आमंत्रित करणे दक्ष चुकून विसरले असावे. त्यामुळे सती न बोलावणे येताही तेथे उपस्थित झाली. यावेळी दक्ष राजाने महादेवांच्या राहणीमान आणि वेशभुषेवरून सतीला हिनवले. पतीचा अपमान सहन न झाल्याने रागाच्या भरात तिने यज्ञकुंडात उडी मारून आत्मदाह करून घेतला. सतीच्या अशा प्रकारे निघून जाण्याम ळे महादेवांना खूप रग आला. विरभद्र रूपात त्यांनी दक्ष राजाचा यज्ञ उद्धवस्त केला आणि दक्ष राजास मारून टाकले. मात्र त्यांचा राग येथेच शांत झाला नाही. राग आणि शोकाच्या भरात त्यांनी सतीचे अर्धवट जळालेले मृतदेह आपल्या खांद्यावर घेतले आणि संहार तांडव हे नृत्य आरंभ केले.

संहार तांडवामुळे संपूर्ण ब्रम्हांड नष्ट होईल अशी भिती सर्व देवतांना वाटू लागली. महादेवांना शोकस्थितीतून बाहेर काढण्यासाठी विष्णूंनी आपल्या सुदर्शन चक्राने सतीच्या शरिराचे तुकडे केले. सतीच्या शरीराचे हे तुकडे पृथ्वीवर ज्या ज्या ठिकणी पडले, तेथे एक शक्तीपिठ निर्माण झाले. महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर सोबतच तुळजापूर (जि.धाराशिव) आणि माहूर (जि.नांदेड) अशी आणखी दोन शक्तीपिठे आहेत. तर वणी (जि.नाशिक) येथील सप्तशृंगी देवीला अर्थ शक्तीपिठ मानण्यात येते. कोल्हापूर येथे सतीचा डोळा पडला होता असे मानले जाते. यामुळे आपोआपच या जागेचा संबंध सती (शक्तीचे एक रूप) यांच्यासोबत जोडला गेलेला आहे. तमोगुणयुक्त रूपात महाकाली तर सत्वगुणायुक्त रूपात महासरस्वती झाली. अशी कथा आहे. पुढे तिने लक्ष्मी, ब्रह्मदेव यांना जन्म दिला. म हाकालीने शंकर, त्रयी, विद्या यांना तर महासरस्वतीने विष्णू, गौरी यांना जन्म दिला. अशाप्रकारे विश्वनिर्मितीला प्रारंभझाला. विराट स्वरूपात प्रगट झालेली काश्म ीर, कांची, कामाख्या ही देवीची तीन पीठे होत. अंबाबाई, महालक्ष्मीच्या देवालयाबाबत संशोधन परिपूर्ण नाही. शिलाहार देवीचे भक्त असल्याने देवीचा वरप्रसाद त्यांना मिळाल्याचे संदर्भ काही ठिकाणी आढळतात. मंदिरातील रचना चक्रराज

आढळतात.सर्वतोभद्रमंडल प्रमाणे आहे. महालक्ष्मीची मूर्ती दगडी चौथऱ्यावर असून सुंदर नक्षीकाम केलेला घाटी दरवाजा, गरुड मंडप. पाच शिखरांसह गर्भगृहमंडप, मध्यमंडप, गरुडमंडप असे तीन मंडप आहेत. भगवान शंकर आणि परमदेवीम ध्ये स्थानाच्या महानतेवरून झालेला वाद भगवान विष्णूंनी संपवला. विश्वनिर्मितीनंतर भगवान विष्णूने काशी, करवीरची निर्मिती केली असे जाणकार सांगतात. लक्ष्मीने कोल्हासूर राक्षसाचा वध केल्यानंतर नगराचे नाव त्याच्या नावावर ठेवण्याची त्याची इच्छा असल्याने हे शहर कोल्हापूर म्हणून ओळखले जाऊ लागले. शैवांच्या मते अंबाबाई पार्वतीचे रूप आहे तर वैष्णव तिला महालक्ष्मीचे रूप मानतात. करवीरक्षेत्र श्रीमहालक्ष्मीचं आवडतं ठिकाण असल्याने तिथं नतमस्तक होणाऱ्या भक्ताला भक्तिचा पाझर फ टतो. खण नारळाची ओटी, हिरवा चुडा, तेजोमय प्रभावळी जरतार शोभे पिवळ्या रंगाची. स्त्रीशक्तीचा जागर भोंडला, भुलाई चाले, बाया जमती हळदीकुंकवासी. महालक्ष्मी, अंबा म ातेचा उदो उदो करत दिवट्या पेटतात, अंबा आली गोंधळाला, चला वाजवू संबळाला म्हणतं, राती जागविल्या जातात. अशा महाकाली महालक्ष्मी, महासरस्वती रूपातल्या करवीर निवासिनी अंबाबाई, श्री महालक्ष्मीला आमचा दंडवत...!!

**ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर**
**९८६७७३२५०४.**

### नमन त्या प्रत्येक स्त्रीला

ती केवळ स्त्री नाही,
ती सृष्टीचा श्वास आहे,
ती मायेचा अथांग सागर,
ती संघर्षाचा ध्यास आहे.

कधी आई होऊन मायेची सावली,
कधी बहीण होऊन विश्वास देते,
कधी लेक बनून अंगण फुलवते,
कधी सहचारिणी होऊन आयुष्याला साथ देते.

स्वप्नं तिचीही असतात,
आकाशाला गवसणी घालण्याची,
जिद्द तिच्यातही असते,
वादळातही ठाम उभं राहण्याची.

ती कोसळते, तरी सावरते,
दुःख पचवून पुन्हा हसते,
साऱ्या जगाला जपताना,
कधी स्वतःलाच विसरून बसते.

तिला नको दयेची भीक,
नको सहानुभूतीचा आधार,
तिच्या कर्तृत्वाला मान द्या,
तिच्या स्वप्नांना द्या भरारी अपार.

तिच्या त्यागाचे गोडवे गाण्यापेक्षा,
तिच्या हक्कांचा सन्मान करा,
तिला देवी म्हणण्याआधी,
माणूस म्हणून स्वीकारा.

नमन त्या प्रत्येक स्त्रीला,
जी अंधारातही प्रकाश पेरते,
पण नमन त्याही स्त्रीला,
जी स्वतःसाठी जगण्याचं धाडस करते.

कारण स्त्रीचं मोठेपण
फक्त इतरांसाठी जगण्यात नाही,
तर स्वतःचं अस्तित्व जपत,
स्वतःच्या आकाशात झेप घेण्यातही आहे.

**कीर्तिराज आगलावे, पुणे**

## नवरात्रीच्या देवीचे तिसरे रूप : चंद्रघंटा देवी

**१३ ऑक्टोबर २०२६ म्हणजेच नवरात्राचा तिसरा दिवस!**

देवींच्या नऊ रूपांची नऊदिवस पूजा केली जाते . त्यापैकी पहिल्या दिवशी शैलपुत्री देवी म्हणजेच भवानी , पार्वती देवी तर दुसऱ्या दिवशी ब्रह्मचारींणी म्हणजेच तपश्चारीणी देवी यांची माहिती आपण पाहिलीच आहे आता नवरात्रातील तिसरी देवी चंद्रघंटा देवी हिची माहिती पाहू .

नवरात्रीमध्ये तिसरी माळ ही देवी चंद्रघंटा हिच्या नावाने बांधतात. तिसऱ्या दिवशी दुर्गे ची तिसरी शक्ती चंद्रघंटा या देवीची पूजा केली जाते. चंद्रघंटेच्या कृपेने अलौकीक वस्तुचे दर्शन होते. दिव्य सुगंधाचा अनुभव येतो. विविध प्रकारचे दिव्य आवाज ऐकायला येतात. साधकासाठी हे क्षण अत्यंत महत्वाचे असतात. या दिवशी साधकाचे मन मणिपूर चक्रात प्रविष्ट होते. शांतीदायक आणि कल्याणकारी अशी ही देवी सर्व संकटांचे निवारण करते. मस्तकावर घंटेचा आकार असणारा अर्धचंद्र असल्यामुळे हिला चंद्रघंटा देवी म्हणतात. नवरात्रमध्ये तिसऱ्या दिवशी या दिवशी लाल रंगाचे वस्त्र परिधान करावे. हा लाल रंग म्हणजे सर्वांच्या वैयक्तिक आयुष्य आणि व्यवसायिक आयुष्यावर सर्वात जास्त प्रभाव टाकणारा हा रंग आहे.नवरात्रीतील देवीचे चंद्रघंटा स्वरुप खूपच कल्याणकारी असतं असे मानले जाते . चंद्रघंटा देवीला दशभुजा असून गळ्यात पांढऱ्या फुलांची एक माळ असते. गोकर्ण किंवा कृष्णकमळ यांची मालाही तिला प्रिय आहे .

चंद्रघंटा देवीला दहा हात आहेत. खड्ग, धनुष्यबाण ही तिची शस्त्रे आहेत. तर वाहन सिंह आहे. शरीराचा रंग सोन्यासारखा चमकणारा आहे. नेहमी युद्धासाठी तयार अशी हिची मुद्रा आहे. चंद्राघंटा देवीच्या कृपेने भक्तांचे सर्व पाप आणि संकट दूर होतात. या दिवशी लाल रंगाचे वस्त्र परिधान करावे. हा लाल रंग वैयक्तिक आयुष्य ते व्यवसायिक आयुष्यापर्यंत सर्वात जास्त प्रभाव टाकणारा रंग आहे. सगळ्यात जास्त आकर्षक मानला गेलेला रंग आहे. म्हणून लाल रंगाला सर्वांत जास्त महत्व आहे . अधिक आशादायी आणि कार्यक्षम असा हा लाल रंग आहे .

भारतात आणि बऱ्याचशा पूर्व आशियाई देशात लाल रंगाला खूप महत्त्व आहे. लग्नकार्यात वधूची साडी, कपाळावरचे कुंकू, शेला, तोरणे यांचा हा रंग. सर्वांचे लक्ष लवकर वेधून घेणारा हा रंग. धोका दर्शवण्यासाठी जगभरात हा प्रमाणित आहे. लाल रंगाची जे निवड करतात ते अधिक आशादायी आणि कार्यक्षम असतात.

उत्साह, क्रिया, इच्छाशक्ती याचे हा रंग प्रतीक आहे. शक्ती, युद्ध आणि धोका यांना सूचित करणारा, लाल रंग आकर्षित करून घेणारा आहे. लाल रंगामुळे पचनक्रिया आणि श्वसनक्रिया सुधारते तर रक्तदाब वाढतो. 'मी, माझे' या भोवतीच घुटमळणारा रंग असे याचे वर्णनं करता येईल. याच्या प्रभावाखाली बाकीचे सर्वच रंग एकदम फिके पडतात .

स्त्रियांच्या आयुष्यात याचे विशेष महत्व आहे.

एखाद्या मिटिंगमध्ये स्वत:चे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी, कोणासमोर भाषण देताना हा रंग सर्वांचे लक्ष तुमच्यावर केंद्रित करायला, आकर्षीत करायला मदत करतो. लहान मूल सुद्धा म्हणूनच तर लाल रंगाकडे लगेंच आकर्षीत होते . हा लाल रंग शारीरिक ऊर्जेशी जोडला गेला आहे. या रंगामुळे स्वत:ची शारीरिक ऊर्जा वाढते पण समोरच्याची कार्यक्षमता आणि विचार करण्याची कुवत घटते. लाल रंग वेगाचा, आक्रमकतेचा, स्त्री-पुरुषातील आकर्षणाचा रंग आहे. स्त्रियांच्या आयुष्यात याचे विशेष महत्व. दर महिन्याला स्त्रीच्या शरीरात जो सृजनाचा उत्सव साजरा होतो त्या शरीरधर्माचा, स्त्रीत्वाचा हा रंग समजला जातो.

चंद्रघंटा देवीचे पूजन अत्यंत मनोभावे करावे. नवरात्रीच्या तिसऱ्या दिवशी लवकर उठून नित्यकर्म आटोपल्यानंतर सूर्याला अर्घ्य अर्पण करावे. यानंतर व्रताचा संकल्प करून पूजा करावे. चंद्रघंटा देवीचे पूजन करताना पिवळ्या किंवा सोनेरी रंगाची वस्त्रे परिधान करावे, तसंच चंद्रघंटा देवीला पांढऱ्या रंगाच्या मिठाईचा नैवेद्य दाखवावा. यामध्ये खीर, बर्फीचा आवर्जुन ठेवा. याशिवाय देवीला मध अर्पण करा.

नवरात्रीच्या तिसर्या दिवशी चंद्रघंटा देवीसमोर एका छोट्या लाल कपड्यात लवंग, सुपारी आणि पान ठेवून ते चंद्रघंटाच्या चरणी अर्पण करा. यानंतर देवाच्या नवार्ण मंत्राचा १०८ वेळा जप करा. त्याशिवाय तुम्ही चंद्रघंटाच्या बीज मंत्राचाही जप करु शकता. त्यानंतर ही लाल कपड्यात सुपारी , लवङ्ग बांधलेली पर्चुंडी तिजोरीत किंवा जिथे तुम्ही पैसे ठेवतात तिथे ठेवा. जेव्हा तुम्ही कोणत्याही शुभ कार्यासाठी निघाल किंवा न्यायालयाशी संबंधित कोणतेही काम तेव्हा हे बंडल जवळ ठेवा. या उपायामुळे तुमचा आत्मविश्वास वाढतो आणि शत्रूची प्रत्येक चाल अपयशी ठरण्यास मदत होत

भूतलावर धर्माचे रक्षण आणि अंधःकार दूर करण्यासाठी चंद्रघंटा देवी प्रकट झाली, अशी आख्यायिका आहे. या देवीची उपासना, आराधना केल्यास आध्यात्मिक आणि आत्मिक शक्ती प्राप्त होते असं शास्त्रात सांगण्यात आलं आहे. यासह तिसऱ्या दिवशी केलेल्या दुर्गा सप्तशती पठणामुळे उपासकांना यश, प्रगती, कीर्ती, मान, सन्मान प्राप्त होतं, असं शास्त्रात सांगितलं आहे. चंद्रघंटा देवीला प्रसन्न करण्यासाठी तिला मनोभावे नमस्कार करून पुढील मंत्र म्हणावा .

**पिण्डकोपास्त्रकेर्युता।**
**प्रसादं तनुते मह्यं चंद्रघण्टेति विश्रुता।।**
**या देवी सर्वभूतेषु मां चंद्रघंटा रूपेण संस्थिता।**
**नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमो नम:।।**

यावर्षी तिसऱ्या दिवशी ग्रह आणि नक्षत्राच्या रचनेनुसार या दिवशी लाल हा शुभ रंग दर्शवला आहे. त्यामुळे यादिवशी सर्वजण लाल रंगाची वस्त्रे,साड्या देखील परिधान करु शकतात.या दिवशी हार,माला देवीला तुळशीची घालावी. आणि घटाची माळ लाल,पांढऱ्या गुलाबाच्या फुलाची,किंवा कोणत्याही सुवासिक फुलांची लावावी. झेंडूची माळ सुद्धा चालते.

**– सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### चाऱ्याचे भाव भिडले गगनाला; पशुधन जगविणे झाले मुश्कील



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यासह टाकळी ढोकेश्वर परिसरात यंदा भीषण दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. पावसाळा संपत आला तरीही जिल्ह्याच्या सरासरी पावसाच्या प्रमाणात मोठी तूट आहे. परिणामी पारनेर परिसरात ऑक्टोबर महिन्यातच पाण्याची टंचाई जाणवत आहे. चाऱ्याच्या दरात दर प्रचंड वाढ झाली असून चाऱ्याअभावी पशुधन जगवणे मुश्कील झाले आहे.

टाकळी ढोकेश्वर परिसरात सध्या मक्याचा दर २ हजार ५०० ते ३ हजार रुपये प्रती गुंठ्यापर्यंत पोचला आहे. प्रति एकरी ९० ते १ लाख रुपयांपर्यंत ओल्या मकेचा वैरणीचा दर पोचला आहे. ऑक्टोबर महिन्यातच ही भिषण परिस्थिती आहे मग मार्च, एप्रिल, मे महिन्यात काय चित्र असेल या चिंतेत पशुपालक सापडला आहे. अशा परिस्थितीत पशुधन जगवणार कसे? पाऊस नसल्याने चारा तर मिळणार का अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. वाढ न झालेला ऊस चाऱ्यासाठी वापर करायचा तर तोही ५ ते ६००० रुपये प्रती गुंठ्यापर्यंत पोचला आहे. ही चाऱ्याची अवस्था असताना पेंड, वालीस याचे दर पाहता पशुपालकांना खर्चाचा ताळमेळच बसत नाही.

एकीकडे दुधाचा दर थोडाफार वाढला आहे तर वैरणीचे व पशुखाद्याच्या दरांनी अक्षरशः गगनाला हात लावले आहेत. दुष्काळी परिस्थितीत चारा मिळणे मुश्कील आहे. आताच दराने कंबरडे मोडले मग भावी काळात चारा आणायचा तरी कुठून? ऑक्टोबरपासून पुढच्या वर्षी जून महिन्यापर्यंत दुष्काळी परिस्थितीत जनावरांना काय खायला घालायचे? अशी पशुपालकांत धास्ती आहे. याचा दुध व्यवसायावर विपरीत परिणाम होत आहे. परिणामी पशुपालक आताच बाजारात पशुधन विकू लागला आहे. मात्र बाजारात विक्रीसाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात पशुधन येऊ लागल्याने किंमतीत प्रचंड मोठी घसरण झाली आहे.

### माथेरानमध्ये भटक्या कुत्र्यांचा मुलीला चावा नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१२, माथेरान :** दिनांक १२ ऑक्टोबर रोजीसकाळी सरस्वती शाळेत जात असताना अनुष्का अनिल कोकरे या मुलीला सागर डेअरीजवळ भटक्या कुत्र्याने अचानक चावा घेतला या ठिकाणीअशा घटना वारंवार होताना दिसत आहे. या घटनेत तिच्या पायाला जखम झाली. तिला तातडीने बिझी हॉस्पिटलमध्ये नेऊन उपचार करण्यात आले. उपचारानंतर तिला घरी सोडण्यात आले. सागर डेअरीजवळील हा मुख्य रस्ता असून या ठिकाणी अनेक भटकी कुत्री रस्त्याच्या मधोमध बसलेली किंवा खेळताना दिसतात. याच रस्त्यावरून शाळकरी मुले, लहान मुले, पर्यटक आणि स्थानिक नागरिकांची सतत ये-जा सुरू असते. अशा परिस्थितीत अचानक कुत्र्याने चावा घेतल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनुष्काला कोणतीही पूर्वकल्पना नसताना कुत्र्याने अचानक चावा घेतल्याने ती घाबरली होती. सुदैवाने तिला वेळेत रुग्णालयात नेऊन उपचार करण्यात आले. मात्र, अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे.भटक्या कुत्र्यांच्या वावरामुळे शाळकरी मुले आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ शकते. त्यामुळे माथेरान नगरपालिकेने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. विशेषतः शाळांच्या परिसरात आणि मुख्य रस्त्यांवर नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

### प्रधानमंत्री यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवापर्वानिमित्त आयोजित 'विकसित भारत संकल्प, सेवा ज्योती यात्रा'



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१२, शिरपूर (धुळे) :** शिरपुर विधानसभा मतदार संघ अंतर्गत शिरपुर शहर येथील करवंद रोड वरील आमदार संपर्क कार्यालय पासुन भाजपच्या वतीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवापर्वानिमित्त आयोजित 'विकसित भारत संकल्प – सेवा ज्योती यात्रा' कार्यक्रम दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी माजी मंत्री आ. अमरीशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार काशिराम पावरा व धुळे भाजपा जिल्हाध्यक्ष तथा नंदुरबार भाजपा जिल्हा प्रभारी बबनराव चौधरी यांचा सह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवेला अधोरेखित करण्यासाठी देशभर 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून सेवा, समर्पण, राष्ट्रनिर्माण आणि जनभागीदारीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरातील भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. 'विकसित भारत–२०४७' या संकल्पासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा असून, सेवा आणि विकासाच्या माध्यमातून देशाला पुढे नेण्याचा संदेश त्यांनी दिला. शिरपूर येथील आमदार कार्यालय येथे 'सेवा ज्योती' प्रज्वलित करून सेवा ज्योती यात्रेला प्रारंभ करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्वांनी विकसित भारताच्या निर्मितीसाठी योगदान देण्याचा सामूहिक संकल्प केला. याप्रसंगी अनेक मान्यवर तसेच भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चंद्रपूरात 'मन वढायं वढायं...' वर उद्बोधन वर्ग संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, चंद्रपूर :** प्रभात बहुउद्देशीय संस्था, चंद्रपूर (एफ/९३१५) द्वारा संचालित मनोबल फाउंडेशन (एक पाऊल स्व जाणीवेचं) तर्फे जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. 'मन वढायं वढायं...' या विषयावर रोकडे ज्वेलर्स सभागृह, गिरनार चौक, चंद्रपूर येथे दि.१२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध समुपदेशक डॉ. अनिल पेटकर यांनी मार्गदर्शन केले. मनाची चंचलता, नैराश्य, ताण– तणाव आणि आजच्या धावपळीच्या जीवनात मानसिक स्वास्थ्य कसे जपावे यावर त्यांनी सखोल आणि मनमोकळे मार्गदर्शन केले. प्रसंगी त्यांनी दीप लऑशॅरीहळपस चे प्रात्यक्षिक घेऊन उपस्थितांना त्याचे महत्त्व समजावून सांगितले, प्रसंगी मानसिक आजार ओळखणे आणि वेळीच त्यावर उपचार करणे गरजेचे आहे हे आवर्जून सांगितले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आनंद एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक आनंद कवाडे उपस्थित होते.

## कायदा सर्वांसाठी समान; अनधिकृत बांधकामांवर बिनधास्त कारवाई करा - मंत्री प्रताप सरनाईक

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**



**दि.१२, मिरा–भाईंदर :** मिरा–भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चेना वरसावे परिसरातील आदिवासी बांधवांच्या घरावर पालिका प्रशासनाकडून बुलडोझर फिरवला जात असताना, कायद्याची अंमलबजावणी ही सर्वसामान्य नागरिक असो की कोणता बडा लोकप्रतिनिधी, सर्वांसाठी अगदी समान पद्धतीनेच झाली पाहिजे. अशी अत्यंत रोखठोक व आक्रमक भूमिका महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांनी स्पष्ट केली आहे.

चेना वरसावे येथील स्थानिक भूमि पुत्र व आदिवासींच्या घरावर बुलडोझर फिरवून कारवाई केली जात असतानाच, आमदार नरेंद्र मेहता यांच्या मालकीच्या '७/११ हॉटेल अँड क्लब' तसेच 'सी अँड रॉक हॉटेल' या कथित अनधिकृत बांधकामांवर देखील त्याच तत्परतेने बुलडोझर फिरवला गेला पाहिजे, असा स्पष्ट जाब मंत्री सरनाईक यांनी तत्कालीन अतिरिक्त आयुक्त प्रियांका राजपूत यांच्यासमोर मांडला होता. जो नियम आणि कायदा स्थानिक भूमिपुत्र व गरिबांना लावला जातो, तोच समान नियम आणि कायदा नरेंद्र मेहता यांच्या मालकीच्या ७/११ क्लब आणि सी अँड रॉक हॉटेलला देखील लावून कडक कारवाई झाली पाहिजे, हीच लोकप्रतिनिधी म्हणून मुख्य भूमिका मंत्री सरनाईक यांनी त्यावेळी मांडली होती.

या संपूर्ण कारवाईशी संबंधित आणि पालिकेच्या अधिकाऱ्यांशी झालेल्या संभाषणाचा एक व्हिडिओ सध्या समाजमाध्यमांवर वेगाने प्रसारित केला जात असून, त्याबाबत अत्यंत चुकीचे व दिशाभूल करणारे समज पसरवले जात आहेत.

चेना येथील कारवाईचा व्हायरल झालेला हा जुना व्हिडिओ आणि तत्कालीन अतिरिक्त आयुक्त प्रियांका राजपूत यांची प्रशासकीय कारणास्तव वसई–विरार महानगरपालिकेत उपायुक्तपदी झालेली बदली या दोन पूर्णपणे स्वतंत्र बाबी आहेत. मात्र, काही लोक या या संदर्भात आपल्या पोळ्या भाजण्यासाठी या प्रशासकीय बदलीसंदर्भातील प्रकरणाला मुद्दाम हून या व्हायरल व्हिडिओशी जोडून पत्रकारांच्या ग्रुपवर अपप्रचार पसरवत आहेत, जे की अत्यंत चुकीचे, निराधार आणि खोडसाळपणाचे आहे.

कांदळवनांचे रक्षण, पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन आणि स्थानिक भूमिपुत्र व आदिवासी बांधवांच्या कायदेशीर हक्कांचे रक्षण या अत्यंत संवेदनशील बाबी आहेत. ७/११ क्लब व सी अँड रॉक हॉटेलच्या बांधकामामुळे स्थानिक आदिवासींच्या होणाऱ्या संभाव्य नुकसानीबाबत आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची सक्षम यंत्रणांनी निष्पक्ष चौकशी करणे गरजेचे आहे. या प्रकरणात नियमांचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्यास प्रशासनाने कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी.

समाजमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या अपुऱ्या आणि दिशाभूल करणाऱ्या व्हिडिओवर आधारित निष्कर्ष न काढता अधिकृत कागदपत्रे व वस्तुस्थितीच्या आधारेच चर्चा व्हावी; प्रशासनाने पूर्णपणे निष्पक्ष काम करावे आणि स्थानिक भूमिपुत्र व आदिवासींना पूर्ण न्याय मिळावा, हीच मंत्री प्रताप सरनाईक यांची ठाम आणि स्पष्ट भूमिका असल्याचे ते म्हणाले.

## लासूर स्टेशन येथे वीर जिवाजी महाले जयंतीनिमित्त वैचारिक प्रबोधनाचा जागर

### भव्य बाइक रॅलीने संपूर्ण परिसर शिवमय; आंतरजातीय विवाहांच्या नियमावलीवरही इंदुरीकर महाराजांचे परखड भाष्य

**अक्षराज : जितेंद्र लिंगायत**



**दि.१२, गंगापूर (छ.संभाजीनगर) :** जीवाला जीव देणारा मित्र असण्यापेक्षा जीवनाला योग्य दिशा देणारा मित्र असावा,

असा मूलमंत्र देत छत्रपती शिवाजी महाराजांना आयुष्यभर निष्ठावंत साथ देऊन नाभिक समाजाची मान उंचवणाऱ्या वीर जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त लासूर स्टेशन येथे नाभिक समाजाच्या वतीने विशेष प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात

**जिंकावा संसार । येणें नांवें तरी शूर ।।१।।**
**येरें काय तीं बापुडीं । कीर अहंकाराचीं घोडी**
**।।ध्रु.।।**
**पण ऐशा नांवें । देवा धरिजेतो भावें ।।२।।**
**तुका म्हणे ज्यावें । सत्कीर्तीनें बरवें ।।**

या अभंगाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करत वीर जिवाजी महाले, शिवा काशीद आणि तानाजी मालुसरे यांच्या अतुलनीय त्यागाचे व शौर्याचे भावपूर्ण स्मरण करण्यात आले.

**भव्य बाइक रॅलीने सोहळ्याचा उत्साह द्विगुणित**

जयंती उत्सवाचे औचित्य साधून नुकतेच लासूर स्टेशन शहरात भव्य 'मोटारसायकल रॅली' काढण्यात आली. या रॅलीत परिसरातील युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कर्तृत्वाने इतिहास जिवंत ठेवणारे छत्रपतींचे मावळे प्रबोधन सत्रात बोलताना महाराजांनी नितीन कांजूने आणि लासूर स्टेशन येथील नाभिक समाजाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले. कादंबरी, कथा व कविता लिहिणे वेगळे आणि स्वतःच्या कर्तृत्वाने इतिहास जिवंत ठेवणे वेगळे आहे. कोणतीही अनुकूल वातावरण नसताना या वीरांनी वादळातही पाय रोवून उभे राहून इतिहास घडवला. झाडाला वादळात टिकून राहण्यासाठी त्याची मुळे जशी मजबूत असावी लागतात, तसेच छत्रपतींचे मावळे कोणत्याही संकट काळात स्वराज्यासाठी अभेद्य भिंतीसारखे उभे राहिले, असे विचार यावेळी व्यक्त करण्यात आले.

**❋ जयंतीचा पहिला संकल्प**

'झेडपी'ची शाळा वाचलीच पाहिजे!

या जयंती कार्यक्रमाच्या व्यासपीठावरून शिक्षण आणि सामाजिक समस्येवर अत्यंत महत्त्वाचे व परखड भाष्य करण्यात आले,

इंग्रजी शाळा विरुद्ध जिल्हा परिषद शाळा

आजची इंग्रजी माध्यमाची शाळा ही एखाद्या 'नवीन नवरीसारखी' भासते, परंतु ग्रामीण भाग व गरीब मुलांच्या शिक्षणाचा खरा आणि भक्कम पाया हा जिल्हा परिषदेच्या (झेडपी) शाळाच आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळा वाचवण्यासाठी सर्व सामाजिक कार्यकर्ते, नेते आणि चळवळीतील धुरंधरांनी प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत. गावातील सर्व मुले आणि संपूर्ण समाज एकत्र आला, तरच झेडपीच्या शाळा टिकू शकतील. या माध्यमातून राजकीय व सामाजिक व्यवस्थेला शाळा वाचवण्याचे आणि गरिबांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्याचे जाहीर आवाहन करण्यात आले.

**दुष्काळ आणि कर्जाला घाबरू नका; संकटांशी दोन हात करा**

प्रसिद्ध समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी आपल्या खास शैलीत दुष्काळ, शेतकरी–कष्टकऱ्यांचे प्रश्न आणि सामाजिक विषयांवर रोखठोक विचार मांडले: कर्जाला घाबरू नका आणि मनात कधीही आत्महत्येसारखा वाईट विचार आणू नका. संकटाशी दोन हात करण्याची तयारी ठेवा. इतिहासात जिंकायला एक हार आणि एक विजय पुरेसा असतो. त्यामुळे एकत्र राहण्यासाठी आणि स्वतःच्या हक्कासाठी प्रत्येकाने पेटून उठले पाहिजे! असे इंदुरीकर महाराजांनी ठणकावून सांगितले.

**आंतरजातीय विवाहाबाबत नेत्यांना कायदा व नियमांचे आवाहन**

आपल्या प्रबोधनादरम्यान निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी आजच्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य करताना आंतरजातीय विवाहाचा संवेदनशील मुद्दा उपस्थित केला.

आंतरजातीय विवाह करताना मुलीच्या बाजूच्या किमान एका तरी जवळच्या नातेवाईकाचा (पालकांचा) साक्षीदार/संमती असणे अनिवार्य केले पाहिजे. याविषयी राजकीय नेत्यांनी व लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष देऊन योग्य ते धोरण किंवा नियम आणावेत, असे महत्त्वाचे आवाहन त्यांनी व्यासपीठावरून राजकीय नेतृत्वाला केले.

**मान्यवरांची उपस्थिती आणि संयोजन**

या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून माजी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादासजी दानवे, दिलीप गवळी, दादासाहेब काळे, पंचायत समिती सदस्य दादा पाटील जगताप, अमोल शिरसाठ, प्रदीप भुजबळ आदी मान्यवर उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन कडुबाळ महाराज यांनी केले.

**हा भव्य कार्यक्रमाचे आयोजन**

मनमिळावू स्वभावाचे लासूर नागरीतील सर्वांचे आवडते व्यक्तिमत्व शिवसेना (उबाठा) गटाचे उपजिल्हाप्रमुख नितीन कांजूने, प्रतीक लिंगायत, मोहसीन बागवान, विजय भाले, प्रतीक खंडेलवाल, आकाश भगुरे, अशोक खिल्लारे, यांनी केले होते तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल शिरसाठ, सोमा निकम, गणेश व्यवहारे, प्रभू बागुल, रितेश चंडलिया, पवन भंडारे, रवी वाघ, राजू तुपे, रुपेश तुपे व शुभम धने यांच्यासह वाघ, लिंगायत, घोडके, तुपे, धने, मोरे , औटी आणि बनकर परिवारातील सदस्यांनी व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला लासूर स्टेशन पंचक्रोशीतील नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तलासरी येथे नेत्ररोग तपासणी शिबिर व चष्मे वाटप कार्यक्रम संपन्न

### आमदार कॉ.निकोले यांच्या हस्ते लाभार्थ्यांना चष्म्यांचे वाटप

**अक्षराज : निलेश कासट**



**दि.१२, तलासरी (पालघर) :** तलासरी तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती तलासरी आणि वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुणालय तलासरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नेत्रोग तपासणी शिबिर व चष्मे वाटप कार्यक्रम सोमवार, दि.१२ ऑक्टोबर २०२६ रोजी डहाणू विधानसभा मतदारसंघाचे आमदार कॉ. विनोद निकोले यांच्या हस्ते पार पडला. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करून गरजू लाभार्थ्यांना चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याच्या सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात आणि विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांना नेत्ररोग तपासणी व उपचारांचा लाभ मिळावा, या दृष्टीने अशा आरोग्य शिबिरांचे महत्त्व अधोरेखित होते. डोळ्यांच्या आजारांचे वेळीच निदान होणे, दृष्टीदोष असलेल्या नागरिकांना योग्य मार्गदर्शन मिळणे आणि आवश्यकतेनुसार चष्म्यांचा लाभ मिळणे, यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला.

या कार्यक्रमाला तलासरीचे तहसीलदार अमोल पाठक, पोलीस निरीक्षक अजय गोरड, गटविकास अधिकारी वैभव साबळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.श्रीकांत कुलकर्णी आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रभाकर भोय यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आरोग्य विभागातील परिचारिका, आशा सेविका तसेच मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते. शिबिराच्या आयोजनासाठी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळणे आवश्यक असून, आरोग्यविषयक जनजागृती आणि प्रतिबंधात्मक तपासणीच्या माध्यमातून नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी अशा उपक्रमांना विशेष महत्त्व आहे. तलासरी येथे आयोजित करण्यात आलेल्या या नेत्ररोग तपासणी शिबिरामुळे नागरिकांना आरोग्य सेवेचा लाभ मिळाला.

अक्षराज



# एल निनो च्या संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर माथेरानच्या पाणी प्रश्नाचे नियोजन आतापासूनच हवे

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१२, माथेरान :** माथेरानची ओळख निसर्गसंपन्न पर्यटनस्थळ म्हणून आहे. हिरवीगार वनराई, डोंगरदऱ्या, नैसर्गिक झरे आणि विहिरी ही या शहराची नैसर्गिक संपत्ती आहे. मात्र, बदलते हवामान, पावसाच्या अनिश्चिततेची शक्यता, वाढती पर्यटकसंख्या आणि पाण्याची वाढती गरज लक्षात घेता माथेरानच्या पाणीप्रश्नाकडे आतापासूनच गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.



उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा पावसाळ्यानंतरच्या काळातच पाण्याचे योग्य नियोजन करणे ही काळाची गरज आहे.एल निनो ही पॅसिफिक महासागराच्या विषुववृत्तीय भागातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सामान्यपेक्षा वाढण्याशी संबंधित हवामान घटना आहे. या घटनेचा जागतिक हवामानावर परिणाम होऊ शकतो आणि भारतातील मान्सूनच्या पर्जन्यमानावरही त्याचा प्रभाव पडला आहे. त्यामुळे हवामान विभागाच्या अंदाजांवर लक्ष ठेवून संभाव्य परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास किंवा उन्हाळ्यात उष्णता वाढल्यास त्याचा परिणाम पाण्याच्या उपलब्धतेवर होऊ शकतो. अशा परिस्थितीत माथेरानसारख्या पर्यटनस्थळाने पाणी व्यवस्थापनाबाबत अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. माथेरानच्या नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन आवश्यकमाथेरानला धोबी तलाव, हॅरिसन स्प्रिंग, पेमास्टर वेल, अमन लॉजजवळील विहीर, मेलट स्प्रिंग, कोरोनेशन पॉईंटजवळील झरा, गाय झरा, मंकी पॉईंटजवळील झरा, राम मंदिरामागील विहीर, बेलव्हेडर पॉईंटजवळील झरा, डेंजर पाथ झरा आणि रामबाग झरा अशा विविध नैसर्गिक जलस्रोतांची संपत्ती लाभली आहे. या स्रोतांचे योग्य सर्वेक्षण करून त्यांची सद्यस्थिती, पाण्याची उपलब्धता आणि संवर्धनाची आवश्यकता तपासली पाहिजे.

नैसर्गिक झरे आणि विहिरींची आवश्यक साफसफाई, पाणलोट क्षेत्राचे संरक्षण, पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी उपाययोजना, तांत्रिकदृष्ट्या योग्य ठिकाणी लहान बंधारे आणि पाणी साठवण व्यवस्था उभारण्याचा विचार केला पाहिजे. मात्र, माथेरानचे पर्यावरण आणि वनसंपत्ती अबाधित ठेवूनच अशा उपाययोजना राबविणे आवश्यक आहे.

यासाठी नगरपालिका, वन विभाग आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे. बाहेरील पाणी पुरवठ्यासोबत स्थानिक स्रोतांचा ही विचार हवामाथेरानला नेरळ-कुंभा येथून पाणीपुरवठा होत असला, तरी शहराची वाढती पाण्याची गरज लक्षात घेणे आवश्यक आहे. स्थानिक नागरिक, हॉटेल व्यवसाय, दुकाने आणि पर्यटक यांच्यामुळे पाण्याचा वापर वाढतो. पर्यटन हंगामात ही गरज अधिक तीव्र होऊ शकते. त्यामुळे केवळ बाहेरून होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून न राहता उपलब्ध नैसर्गिक स्रोतांचे संवर्धन आणि पावसाच्या पाण्याचे नियोजन यांनाही प्राधान्य द्यावे.

नगरपालिकेने पाण्याचा दैनंदिन वापर, उपलब्ध साठा, वितरण व्यवस्था आणि संभाव्य गरज यांचा आढावा घेऊन कृती आराखडा तयार करावा. पाणीगळती रोखणे, अनावश्यक वापरावर नियंत्रण ठेवणे आणि गरज भासल्यास टप्प्याटप्प्याने पाणीबचतीचे उपाय राबविणे आवश्यक आहे पाणीटंचाईचा प्रश्न केवळ उन्हाळ्यातील काही महिन्यांपुरता मर्यादित नसतो. पाण्याची कमतरता निर्माण झाल्यास स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन जीवनासह हॉटेल व्यवसाय, पर्यटन आणि शहराच्या अर्थव्यवस्थेवरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आणि व्यावसायिकाने पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. इमारतींचा परिसर धुण्यासाठी अनावश्यक पाणी वापरणे टाळावे. भांडी आणि कपडे धुताना नळ सतत सुरू ठेवू नये. शक्य तेथे पाण्याचा पुनर्वापर करावा आणि गळणारे नळ तातडीने दुरुस्त करावेत. हॉटेल व्यावसायिकांनीही पाण्याचा वापर नियंत्रित ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात.

निसर्गाने माथेरानला दिलेली जलसंपत्ती ही केवळ आजच्या गरजा भागविण्यासाठी नसून भविष्यातील पिढ्यांसाठी ही जपण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे नगरपालिका आणि वन विभागाने तातडीने संयुक्त कृती आराखडा तयार करून त्याच्या अंमलबजावणीला सुरुवात करावी. कारण पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाय शोधण्यापेक्षा पाणीटंचाई निर्माण होऊ नये. यासाठी आजच नियोजन करणे अधिक महत्त्वाचे आहे. माथेरानच्या निसर्गाचे सौंदर्य जपायचे असेल, तर त्याच्या जलसंपत्तीचे संवर्धन आणि पाण्याचे शाश्वत नियोजन हीच काळाची खरी गरज आहे.

## थोडक्यात बातम्या

### गुडसूर येथे सेवा संकल्प अभियान उत्साहात संपन्न

**अक्षराज : जयराम देमगुंडे**



**दि.१२, उदगीर (लातूर) :** उदगीर महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या वतीने आयोजित सेवा संकल्प अभियान अंतर्गत विशेष प्रमाणपत्र वाटप सोहळा गुडसूर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. दि.१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या या अभियानाचा मुख्य कार्यक्रम दि.१२ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता गुडसूर येथे आयोजित करण्यात आला होता. या शिबिरात ग्रामस्थांना एकाच छताखाली रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र तसेच नवीन ७/१२ व ८-अ उतारा अशा महत्त्वाच्या प्रमाणपत्रांचे सुलभ वाटप करण्यात आले.

यावेळी नायब तहसीलदार विलास सोनवणे ईलमाले मॅडम पुरवठा निरीक्षक संतोष चव्हाण मंडळ अधिकारी नळगीर. ग्राम महसूल अधिकारी कवडेकर ग्राम पंचायत अधिकारी भारत कांबळे गुडसुर ग्रामपंचायत मा. सरपंच बालाजी देमगुंडे राहुल सावरगाव, पठाण, युवराज करेप्पा, कज्जेवाड मॅडम, चोडेकर मॅडम कृषी विभागाचे फारुक शेख साहेब उपकृषी अधिकारी उदगीर. केंद्र दर्शन सहाय्यक कृषी अधिकारी गुडसूर संदीप अंधारे आत्म विभाग. सागर वाघमारे पीएम किसान आरोग्य विभागडॉ.कल्ले प्रशांत एम ओ.डॉ.राठोड एम.ओ.चेतन कुमार स्वामी. एन ए.पाटील एस.गायकवाड अर्चना. जगताप व्ही. श्री राठोड, गावातील माधव टेपाले, पत्रकार नागेश नवाडे. शैलेश देमगुडे. रोप थोडगे भीमसेन कांबळे, पिंटू गुणाले सुभाष सूर्यवंशी उत्तम सूर्यवंशी असे अनेक नाकातील नागरिक उपस्थित होते. डिपार्टमेंटचे जसे की सेतू विभाग. सामाजिक वनीकरण विभाग उदगीर .एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभाग प्रकल्प उदगीर विभाग डोंगरशेळकी.संजय गांधी विभाग. अधिकारी, मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच लाभार्थी उपस्थित होते. शासन आपल्या दारी या संकल्पनेतून सर्वसामान्य नागरिकांना शासकीय सेवेचा थेट लाभ मिळत असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. शेकडो लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतल्याने हे अभियान यशस्वी ठरले असून, प्रशासनाच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# मुरबाडमध्ये काम न करताच लाखांची बिले दिल्याचा आरोप

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.१२, शहापूर (ठाणे) :** ठाणे जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या मुरबाड उपविभागातील रस्त्यांच्या कामांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. प्रत्यक्षात कामे सुरू नसतानाही ठेकेदारांना लाखो रुपयांची रनिंग बिले अदा केल्याचा आरोप करत १२ ऑक्टोबर रोजी मुरबाड तालुका दंडाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.




## तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू

**चार रस्त्यांच्या कामांवरून प्रश्नचिन्ह!**

तक्रारीनुसार, २४ जून २०२६ रोजी चार रस्त्यांच्या कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. यामध्ये मोहरई-शिरगाव-चिखला रस्ता सुधारणा (२० लाख रुपये), तुळई कातकरी वाडी रस्ता (५ लाख रुपये), रामपूर-मरेवाडी रस्ता (५ लाख रुपये) आणि कळंभे-ठाणे रस्त्यावरील संरक्षण भिंतीसह रस्ता सुधारणा (७ लाख रुपये) या कामांचा समावेश आहे. या चारही कामांची एकूण मंजूर रक्कम ३७ लाख रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

**कामे न झाल्याचा आरोप;**

तरीही लाखोंची बिले!तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, २४ जून ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष कामे सुरू झालेली नव्हती. असे असतानाही चार संबंधित कंत्राटदारांना अनुक्रमे ५ लाख, ४ लाख, ४ लाख आणि ५ लाख रुपयांची रनिंग बिले अदा करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या बिलांची प्रत्यक्ष कामांशी पडताळणी करून चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे.

**तक्रारीनंतरही कारवाई नसल्याचा दावा!**

या प्रकरणी २५ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कार्यकारी अभियंता यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली. त्यानंतर २ सप्टेंबर रोजी स्मरणपत्र, ११ सप्टेंबर रोजी उपोषणाचा इशारा आणि २४ सप्टेंबर रोजी अंतिम सूचना देण्यात आल्याचे तक्रारदारांनी सांगितले. मात्र, अपेक्षित कारवाई न झाल्याने १२ ऑक्टोबरपासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

**अहवालावरही आक्षेप;**

चौकशीची मागणीउपोषणाच्या पार्श्वभूमीवर मुरबाड बांधकाम उपविभागाने ९ ऑक्टोबर रोजी अहवाल पाठविला. मात्र, हा अहवाल दिशाभूल करणारा असून त्यातून मागण्यांची पूर्तता झालेली नाही, असा आक्षेप तक्रारदारांनी घेतला आहे. संबंधित चारही कामांची प्रत्यक्ष स्थळपाहणी करावी, मंजूर अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकांची तपासणी करावी, अदा केलेल्या बिलांची चौकशी करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची अधिकृत चौकशी होऊन वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे. संबंधित विभागाचे अधिकृत स्पष्टीकरण आणि चौकशीचा निष्कर्ष अद्याप या वृत्तासाठी उपलब्ध नाही.

### रसायनशास्त्र विभागाचा अभिनव उपक्रम; गरजू रुग्णांना औषधांचे वितरण



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१२, पालम (परभणी) :** पालम शहरातील माधवराव पाटील महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाच्या वतीने गरजू रुग्णांना मदत मिळावी, या उद्देशाने अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या घरी शिल्लक राहिलेली मात्र वापरात नसलेली औषधे संकलित करून ती डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली गरजू रुग्णांपर्यंत पोहोचविण्यात येत आहेत. रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आत्माराम आरसुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या घरी उपलब्ध असलेली अतिरिक्त औषधे व विविध गोळ्या संकलित केल्या. संकलित औषधे शहरातील नामवंत डॉ. रघुराज गाडगीळ यांच्याकडे जमा करण्यात येत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली गरजू रुग्णांना औषधांचे वितरण केले जात आहे. या उपक्रमासाठी डॉ. साईनाथ झांगडे समन्वयक म्हणून भूमिका पार पाडत आहेत. वैष्णवी मलुले, रतिकांत शिंदे, गीता दुधाटे, कु.मेकेवाड यांच्यासह रसायनशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थी या उपक्रमासाठी परिश्रम घेत आहेत.विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत सुरू केलेल्या या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना मदत मिळत असून, पालम शहर व तालुक्यात या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

## न्यायालयीन वाद सुरू असताना PMC व पोलीस प्रशासनाच्या कथित हस्तक्षेपामुळे ज्येष्ठ नागरिक त्रस्त; साखळी उपोषणाचा इशारा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, वडगाव शेरी (पुणे) :** वीणा सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, सर्वे नं. ४३, सोमणाथ नगर, वडगाव शेरी, पुणे येथील अंतर्गत रस्त्याच्या वादामुळे संस्थेतील ज्येष्ठ नागरिक, महिला व रहिवासी गेल्या काही काळापासून मानसिक तणाव आणि असुरक्षिततेच्या वातावरणात राहत असल्याची गंभीर तक्रार संस्थेने केली आहे. संबंधित वाद न्यायालयात प्रलंबित असताना पुणे महानगरपालिका (PMC) व पोलीस प्रशासनाकडून होत असलेल्या कथित हस्तक्षेपामुळे रहिवाशांच्या दैनंदिन जीवनावर, मानसिक स्वास्थ्यावर आणि आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे संस्थेचे म्हणणे आहे.

वीणा सहकारी गृहरचना संस्था ही नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून, संस्थेच्या खाजगी अंतर्गत रस्त्याच्या वापरावरून बाहेरील काही व्यक्तींशी वाद सुरू आहे. संस्थेच्या म्हणण्यानुसार, संबंधित अंतर्गत रस्ता संस्थेच्या हद्दीत असून त्याच्या वापराबाबतचा कायदेशीर वाद सक्षम न्यायालयासमोर मांडण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित हक्कांबाबत अंतिम निर्णय न्यायालयाने द्यावा, अशी संस्थेची भूमिका आहे.



**JCB व मोठ्या पथकासह कारवाईच्या प्रयत्नांमुळे तणाव**

संस्थेच्या म्हणण्यानुसार, दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी झचउ चे संबंधित अधिकारी JCB व पोलीस बंदोबस्तासह संस्थेच्या परिसरात आले होते. त्यानंतर दिनांक ०८ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी सुमारे १:३० वाजता PMC च्या अतिक्रमण विभागाचे अधिकारी JCB व अंदाजे २० ते २५ कर्मचारी/मार्शल्ससह परिसरात आल्याने पुन्हा तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. संस्थेच्या म्हणण्यानुसार, रहिवाशांनी संबंधित कागदपत्रे आणि न्यायालयीन वादाबाबत आपली बाजू मांडली. अखेरीस कोणतीही कारवाई न करता संबंधित पथक परत गेले.

या घटनांमुळे सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक आणि महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अचानक मोठ्या पथकासह होणाऱ्या कारवाईच्या प्रयत्नांमुळे घराबाहेर पडणे, दैनंदिन कामे करणे आणि शांततेत राहणे याबाबतही रहिवाशांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत असल्याचे संस्थेचे म्हणणे आहे.

**ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक व शारीरिक आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर**

संस्थेत ज्येष्ठ नागरिक वास्तव्यास असून, त्यांना सातत्याने तणावपूर्ण परिस्थितीला सामोरे जावे लागत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. वारंवार निर्माण होणारे वाद, कारवाईची भीती, कथित धमक्या आणि प्रशासनाकडून होणाऱ्या हस्तक्षेपामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक शांततेवर व आरोग्यावर परिणाम होत असल्याचे संस्थेने नमूद केले आहे. दिनांक ०८ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या तणावपूर्ण प्रसंगादरम्यान एका ज्येष्ठ महिलेला हाताला दुखापत झाल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. तसेच, संबंधित वादाच्या पार्श्वभूमीवर काही व्यक्तींनी धमक्या दिल्याचे आरोपही करण्यात आले आहेत. या सर्व घटनांची निष्पक्ष चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी संस्थेची मागणी आहे.

**न्यायालयीन वादाचा निकाल न्यायालयातच होऊ द्या!**

संस्थेची स्पष्ट भूमिका आहे की, खाजगी अंतर्गत रस्त्याच्या वापराबाबत कोणाचा कायदेशीर हक्क आहे, याचा निर्णय सक्षम न्यायालयाने घ्यावा. मात्र, न्यायालयीन वाद प्रलंबित असताना ज्येष्ठ नागरिक व महिलांना भीतीच्या वातावरणात राहावे लागणे आणि वारंवार तणावपूर्ण परिस्थिती निर्माण होणे योग्य नाही. आम्ही कायद्याचा आदर करतो. आमची मागणी केवळ एवढीच आहे की, प्रशासनाने आपल्या कायदेशीर अधिकारांच्या मर्यादेत आणि योग्य प्रक्रिया पाळून कार्यवाही करावी. ज्येष्ठ नागरिकांना मानसिक त्रास, असुरक्षितता आणि आरोग्याच्या समस्यांना सामोरे जाण्यास भाग पाडू नये. न्यायालयात वाद सुरू असताना रहिवाशांवर अनावश्यक दबाव निर्माण होऊ नये, अशी भूमिका संस्थेच्या वतीने मांडण्यात आली आहे.

**संस्थेचा ठाम इशारा**

प्रशासनाने या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन ज्येष्ठ नागरिकांचा कथित मानसिक छळ व तणाव थांबवण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत, तर वीणा सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक व रहिवासी शांततापूर्ण मार्गाने साखळी उपोषण सुरू करतील. या आंदोलनाची वेळ येऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने संवाद साधून न्याय्य तोडगा काढावा, असे आवाहन संस्थेने केले आहे.

## कै. कमलबाई आंबेकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त भव्य कीर्तन महोत्सव

## वडगाव सावताळच्या आदर्श मातेच्या स्मृतींना उजाळा

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** लेकुराचे हित। वाहे माऊलीचे चित्त।
ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभावीण प्रिती।।

या संतवचनाप्रमाणे आपले संपूर्ण जीवन कुटुंबासाठी आणि संस्कारांसाठी वेचणाऱ्या वडगाव सावताळ येथील जुन्या पिढीतील आदर्श माता वै.गं.भा. कमलबाई विष्णुपंत आंबेकर यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भव्य दिव्य एक दिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार, दि.१३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत पारनेर तालुक्यातील श्री दत्त सावताळ देवस्थान, वडगाव सावताळ येथे हा भक्तिमय सोहळा संपन्न होणार आहे. यावेळी वारकरी संप्रदायातील अभ्यासू कीर्तनकार प. पू. श्रीगुरु ह. भ. प. उल्हास महाराज सूर्यवंशी (अध्यापक, जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, आळंदी देवाची) यांची सुश्राव्य कीर्तनसेवा होणार आहे. त्यांच्या ओघवत्या वाणीतून कै. कमलबाई यांच्या जीवनकार्याला आणि मातृत्वाला भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली जाणार आहे.

कै. कमलबाई आंबेकर या अत्यंत कष्टाळू, प्रेमळ आणि शिस्तप्रिय माता म्हणून पंचक्रोशीत परिचित होत्या. त्यांनी आंबेकर परिवाराला दिलेले संस्कार आजही आदर्शवत आहेत.

या पुण्यस्मरण सोहळ्यासाठी हभप प्रेमानंद महाराज शास्त्री (आण्णा) आणि समस्त आंबेकर परिवार, आप्तेष्ट व समस्त ग्रामस्थ वडगाव सावताळ यांनी सर्वांना उपस्थित राहण्याचे नम्र आवाहन केले आहे.